# भारत माझा देश ! दगडांचा की माणसांचा ?

-महेंद्र गौरीकुमार बैसाणे(भारुकाका) Mob.: 9321 550 286

पुलवामातील आत्मघाती हल्ल्यानंतर भारतीय लष्कराद्वारे हवाई कारवाईने अतिरेक्यांना दिलेले प्रत्युत्तर आणि कालची विंग कमांडर अभिनंदन यांची पाकिस्तानातून झालेली सुटका या घटनांनी गेले काही दिवस संपूर्ण भारत देश ढवळून निघाला आहे. असे असले तरी काश्मीर प्रश्नासह पाकिस्तान पुरस्कृत अतिरेकी हल्ले हि आपल्या देशातील एकमेव महत्वाची समस्या आहे असे म्हणता येणार नाही. तर दर महिन्याला फक्त महाराष्ट्रातून होणाऱ्या दोन-अडीचशे शेतकरी आत्महत्या, महिला व बालकांवर त्याच दराने होणारे अन्याय-अत्याचार, नुकतीच जाहीर झालेली बेरोजगारीची भयावह आकडेवारी अशा अनेक गंभीर समस्या असून संबधित सर्व यंत्रणांनी आणि देशाच्या प्रत्येक जागरूक नागरिकाने तत्परतेने विचार व कृती करण्याची गरज आहे ! खास करून २ मार्च २०१९ रोजी होणारी 'निर्भया प्रकरणाची' सुनावणी व यातील दोषींना दिल्या गेलेल्या शिक्षेच्या अंमलबजावणी संदर्भात झालेला विलंब बघता ठोस संघटनात्मक पावले उचलण्याची नितांत गरज आहे.

*आज आंतरराष्ट्रीय महिला दिनी समस्त नारी शक्तीला नमन करत असताना 'अगदी तासागणिक' महिलांवर होत असलेल्या अन्यायाविरुद्ध प्रत्येक महिला व पुरुषाने प्रत्यक्ष आवाज उठवून ठोस कृती केली तरच या महिला दिनाच्या शुभेच्छांना काही अर्थ राहील.*

भारतातील महिलांवर होणाऱ्या अन्याय-अत्याचारांची कल्पना येण्यासाठी खैरलांजी, निर्भया आणि कोपर्डी हे तीन शब्द पुरेसे आहेत. किंबहुना हि तीन नावे उच्चारली तरी अंगावर काटा आल्याशिवाय राहात नाही एवढी भयानक दाहकता या तीनही प्रकरणांशी जोडली गेली आहे.

या तीनही घटना प्रातिनिधिक असून प्रत्येक भारतीय नागरिकासाठी शरमेची बाब असताना ती किती जणांना वाटते यावर येणाऱ्या काळातील महिला वर्गावरील होणाऱ्या अन्याय-अत्याचारांची संख्या व स्थिती ठरेल.

९ सप्टेंबर २००६ खैरलांजी-महाराष्ट्र, १६ डिसेंबर २०१२ दिल्ली व १३ जुलै २०१६ कोपर्डी-महाराष्ट्र या तीनही प्रकरणांसंदर्भात संताप आणि चिड आणणारी बाब म्हणजे अनुक्रमे बारा, सहा आणि अडीच वर्षे झाली तरी दोषींना शिक्षा झालेली नाही.

खैरलांजी प्रकरण सुरुवातीपासून संपूर्णतः दुर्लक्षित राहिले आहे त्याची कारणे सर्वज्ञात आहेत.

निर्भया प्रकरणात दिल्लीतील जनतेने सुरुवातीच्या काळात खूप मोठा पाठींबा दिला असला तरी काळ सोकावतो त्यानुसार आजच्या घडीला पाच वर्षांनंतर न्यायासाठी चकरा मारताना निर्भायाच्या आई-वडिलांखेरीज कोणीही दिसत नाही.

कोपर्डी प्रकरणात त्यातल्या त्यात एक गोष्ट अभूतपूर्व घडली ती म्हणजे मराठा समाजाने एकत्र येऊन त्या विरोधात उभारलेला मोठा लढा. असे असले तरी न्यायालयीन दिरंगाईपाई हा लढा कोठवर जातो हे बघावे लागेल. शिवाय या लढ्यातील कलंकित बाजू म्हणजे एका निष्पाप मुलीवर अनन्वित अत्याचार झाले असताना त्यासाठी जातीविरहित लढा का उभा राहू शकला नाही, आणि पुन्हा यातले गुन्हेगार विशिष्ट जातीतील असल्यानेच हा लढा उभा राहिला की कसा? या दोनही गोष्टी फुले-शाहू-आंबेडकरांचा म्हणवणाऱ्या

महाराष्ट्रासाठी न शोभणाऱ्या आहेत. मुळात राज्यात-देशात कुठेही कोणत्याही महिलेवर काही अन्याय-अत्याचार झाला तर त्याची 'सहवेदना' माणूस असणाऱ्या आणि माणूस म्हणवणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला जाणवायला हवी...हि झाली संवेदनशीलता, परंतु तेवढं पुरेसे नाही. हे सर्व थांबायला हवं-थांबवायला हवं हा विचारही कृतीसह पुढे यायला हवा. तरच आपण माणूस म्हणायला लायक ठरू शकतो...

अन्यथा पशुवत अत्याचार करणारे जनावरे आणि ते मुकाट बघणारे दगडच आहेत असे म्हटले तर वावगे होणार नाही...

सरकार आणि शासन व्यवस्था, पोलीस यंत्रणा तसेच न्याय व्यवस्था या कोणत्या थराला पोहोचल्या आहेत ते आपण जाणतो आणि बघतच आहोत.

महिलांच्या संदर्भातील याच विषयाशी संबंधित उपक्रमाविषयी महाराष्ट्राच्या मुख्य सचिवांना गुरुवार दि.२५ जानेवारी २०१८ रोजी ई मेल केल्यावर त्यांनी सुटीच्या तीन दिवसांनंतर सत्वर दि.२९ जानेवारी २०१८ रोजी ई मेलने योग्य ती कारवाई करण्याच्या सुचना महिला आणि बाल कल्याण विभागाच्या सचिवांना दिल्या तरी बाल कल्याण विभागाच्या सचिवांना उत्तर देण्याची सवड मिळालेली नाही की ते देण्याची गरजच त्यांना वाटली नाही हे कळायला मार्ग नाही.

महिलांची सुरक्षा व न्याय मिळवून देण्यात मोठा वाटा-जबाबदारी असणाऱ्या पोलीस यंत्रणेतील काही अत्यल्प सन्माननीय अपवाद वगळता भले-भले कार्यक्षम म्हणवणारे अधिकारी आणि कर्मचारी काय क्षमतेने-ममतेने काम करतात ते जवळून बघितल्यावर-अनुभवल्यावर पदोपदी कळते.

जानेवारी २०१८ च्या दरम्यान  हरियाणा राज्यात लागोपाठ तीन-चार बलात्काराच्या घटना घडल्या. त्यात निर्भया कांडाची पुनरावृत्तीही झाल्याची बाब समोर आली होती. या दरम्यान हरियाणा पोलिसातील एका वरिष्ठ अधिकाऱ्याचे वक्तव्य हरियाणा पोलिस, राज्य सरकार नव्हे तर संपूर्ण माणुसकीला काळिमा फासणारे होते. मुख्यमंत्री खट्टर की काय ते त्यांनी त्या अधिकाऱ्यावर काही कारवाई केल्याचे ऐकिवात नाही.

भारतीय न्याय-व्यवस्थेबाबत काय बोलावे? ते काम सर्वोच्च न्यायालयातील चार न्यायाधीशांनी जानेवारी २०१८ मध्ये केले आहे.

शिवाय तीन  वर्षांपूर्वी सर्वोच्च न्यायालयातील न्यायाधीशांना एकूणच न्याय-व्यवस्थेची अवस्था बघता अश्रू अनावर झाले होते. अशा व्यवस्थेच्या भरवशावर न्यायाची अपेक्षा करणे हे संयमाची परिसीमा बघणारे आणि जुगारा इतके बेभरवशाचे असले तरी पिडितांना तोही जुगार जबरदस्ती खेळावाच लागतो.

कोणत्याही सरकारांचा आणि महिलांवरील अन्याय-अत्याचार याचा बहुधा सुतराम संबंध नसावा. कारण सरकारे बदलली तरी त्यात काही फरक दिसून येत नाही. २०१२ मध्ये निर्भया घडते तर २०१५ मध्ये यातला एक आरोपी जो गुन्ह्याच्या वेळी बाल-गुन्हेगार होता तो अत्यंत क्रुरातला  क्रुर गुन्हा करूनही केवळ कायद्यातील पुरेशा तरतुदी अभावी मोकाट सुटतो यावरून काय ते चित्र पुरेसे स्पष्टच आहे.

महिलांवरील अन्याय-अत्याचारांविषयी आणि न्यायाविषयी आपली सरकारे किती असंवेदनशील असतात हे ही या निमित्ताने स्पष्ट होते. परंतु 'उम्मीद पर दुनिया कायम है' असे म्हणतात.

सरकार आणि शासन व्यवस्था, पोलीस यंत्रणा तसेच न्याय व्यवस्था आज ना उद्या आपापली कर्तव्ये चोखपणे बजावतील. तसेच लोकांच्या आशा-आकांक्षा सर्वंकषपणे पूर्ण करण्याइतपत सुधारतील अशी सकारात्मक भावना बाळगणे तेवढे आजच्या घडीला उचित होईल.

लोकशाहीतील सरते शेवटी उरले 'लोक' त्यांच्यावर लोकशाही जिवंत ठेवण्याची खरी जबाबदारी आहे नव्हे ती त्यांची, त्यांच्यासाठी व त्यांच्याकडूनच राबवली जाणारी यंत्रणा आहे. लोकांच्या समस्यांसाठी लोकांनीच पुढे येणे हि आजची काळाची गरज आहे. त्याचप्रमाणे महिलांनीही त्यांच्यावरील अन्यायाला वाचा फोडण्यासाठी पुढे येणे क्रमप्राप्त आहे. ज्यांच्यावर अन्याय होतो ते त्या विरोधात उभे रहाणार नसतील तर मग कोण पुढे येणार? दुर्दैवाने इतक्या वर्षात महिलांच्या समस्या मांडणारी, प्रश्नांची उत्तरे मागणारी-शोधणारी ना एखादी संस्था-संघटना उदयास आली ना नेतृत्व पुढे आले. या संदर्भातली देशव्यापी पोकळी आजही या दोन्हींच्या शोधात आहे.

कोणतेही ध्येय, कार्य, योजना पार पाडायची असल्यास व्यवस्थापन शास्त्रानुसार तसा संकल्प-निर्धार लिखित-मौखिक स्वरुपात करणे ते ध्येय साध्य करण्याची पहिली पायरी असते. चांगल्या गोष्टींची सुरुवात कोणीही आणि कुठूनही करू शकतो, त्यासाठी कोण काय करतोय किंवा करीत नाही हे बघण्याचीही आवश्यकता नसावी.

*'हे जगणे आणि जग अधिक सुंदर बनवू या'* हा ध्यास बाळगून 'माडि(इंडिया)' वरील सर्व मुद्द्यांच्या संदर्भात पुढाकार घेऊ ईच्छित असून '<u>महिला सन्मान प्रतिज्ञा उपक्रम-२०१९</u>' या अंतर्गत आज ८ मार्चला आंतरराष्ट्रीय महिला दिनी विविध कार्यक्रमाद्वारे सहभागी होऊ ईच्छिणाऱ्या सर्व व्यक्ति-संस्था-घटकांचे स्वागत आहे...नव्हे आपण सर्वांनी यात सहभागी व्हायलाच हवे, नाही का???

या सर्व उपक्रमांमध्ये दिल्लीतील निर्भयाचे आई-वडील व त्यांनी स्थापन केलेली संस्था-*'निर्भया ज्योती ट्रस्ट'*ही सहभागी आहे.

तसेच यासंदर्भात मा.राष्ट्रपती, म.पंतप्रधान, प्रमुख राष्ट्रीय-प्रादेशिक राजकीय पक्ष, राष्ट्रीय-राज्य महिला आयोग व अन्य सुपरिचित व्यक्ति-संस्थांनाही पुढाकार व सहभागासाठी विनंती अर्ज, निवेदने पाठवण्यात आली आहेत.

महेंद्र गौरीकुमार बैसाणे(भारुकाका) Mob.: 9321 550 286

connectmadi@gmail.com

Management And Development Initiative(MADI) INDIA